# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- एक ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स अर्थव्यवस्थेचं उद्दीष्ट गाठण्याकडे महाराष्ट्राची घोडदौड सुरू विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या अभिभाषणात राज्यपालांचं प्रतिपादन
- विधीज्ञ राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड– राज्यसरकारचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर
- विशेष अधिवेशनाचं कामकाज संस्थगित–हिवाळी अधिवेशन येत्या १६ डिसेंबरपासून नागपूर इथं घेण्याची राज्यपालांना शिफारस
- रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती

आणि

- लाडकी बहीण योजनेच्या छाननीबाबतचं वृत्त निराधार असल्याचं माजी मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून स्पष्ट

****

एक ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स अर्थव्यवस्थेचं उद्दीष्ट गाठण्याकडे महाराष्ट्राची घोडदौड सुरू असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते आज विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या संयुक्त सभेसमोर अभिभाषण करत होते. चालू वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीत थेट परकीय गुंतवणुकीत देशभरात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं राज्यपालांनी सांगितलं. गेल्या वर्षातही थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशभरात अग्रेसर होता, याकडे राज्यपालांनी लक्ष वेधलं.

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपचे राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्याला इतर सदस्यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. त्यांच्या रुपाने न्यायप्रिय आणि संयमी व्यक्तिमत्व निवडलं गेलं आहे, ही आनंदाची बाब असल्याचं ते म्हणाले. आपल्याकडे विधानसभा अध्यक्ष बिनविरोध निवडण्याची परंपरा असून, ही परंपरा कायम राहिली असं फडणवीस यांनी नमूद केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी देखील नार्वेकर यांचं अभिनंदन करुन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

अध्यक्ष निवडीच्या या प्रक्रियेवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं बहिष्कार टाकला. आमदार आदित्य ठाकरे यांनी नव्या अध्यक्षांकडून सर्वांना समान न्यायाची अपेक्षा व्यक्त केली.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधानसभा सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमडळावर विश्वास दर्शवणारा ठराव सभागृहात मांडला, तो सभागृहाने आवाजी मंजूर केला.

दरम्यान, जयंत पाटील यांच्यासह चार आमदारांनी आज विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

****

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्यासह विधीमंडळाचे दिवंगत सदस्य मधुकर पिचड, रोहिदास पाटील, बाबा सिद्धीकी, वसंत चव्हाण, यांच्यासह इतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठीचा शोकप्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडला, सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून सर्व दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

त्यानंतर राज्यपालांच्या सूचनेनुसार विधानसभेच्या विशेष अधिवेशनाचं कामकाज संस्थगित करण्यात येत असल्याची घोषणा अध्यक्ष नार्वेकर यांनी केली. विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १६ डिसेंबरपासून नागपूर इथं घेण्याची शिफारस राज्यपालांना करण्यात आल्याची माहिती नार्वेकर यांनी यावेळी दिली.

****

देशभरातले लघु शेतकरी आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कृषी कर्जांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात आज ही माहिती दिली. २०२२-२३ या आर्थिक वर्षात १२ कोटी ३८ लाख रुपयांचं कृषीकर्जवाटप लघु आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना करणात आलं तर २०२३ -२४ या आर्थिक वर्षात १३ कोटी ६ लाख रुपये इतकं कृषीकर्जवाटप या शेतकऱ्यांना करण्यात आल्याची माहिती सीतारामन यांनी दिली.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय मल्होत्रा भारतीय प्रशासकीय सेवेतले राजस्थान क्षेत्रातले १९९० सालचे अधिकारी आहेत. पुढच्या ३ वर्षांसाठी मल्होत्रा यांची ही नियुक्ती असून परवा ११ तारखेला ते आपला पदभार स्वीकारतील.

****

येत्या १३ आणि १४ डिसेंबरच्या रात्री आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होताना दिसेल. याला जेमिनिड्चा उल्का वर्षाव म्हणतात. हा वर्षाव लघुग्रह आणि ३२०० फेथॉन नावाच्या छोट्याशा खगोलीय वस्तूंमुळे तयार होतो. ही वस्तू धुमकेतू तसंच लघुग्रह यामधली एक मानली जाते. हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी आणि अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली असून, ही खगोलीय घटना पाहण्याचं आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने आणि हौशी खगोल अभ्यासक विजय गिरूळकर यांनी केलं आहे.

****

राज्य सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'च्या छाननीबाबतचं वृत्त निराधार असल्याचं, महिला आणि बालकल्याण विभागाच्या माजी मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. त्या आज विधान भवन परिसरात

वार्ताहरांशी बोलत होत्या. याबाबत कोणीही संभ्रम पसरवू नये, असं आवाहन तटकरे यांनी केलं. त्या म्हणाल्या –

***अशा पद्धतीचा कुठेही निर्णय किंवा अशा पद्धतीची कुठेही चर्चा ही शासन स्तरावर झालेली नाही माझ्या माहितीनुसार. त्याच्यामुळे कुठलीही स्क्रुटीनी किंवा फेरचौकशी किंवा फेरतपासणी असा आदेश काही शासनाने काढलेला नाही. त्यामुळे विनाकारण गैरसमज कुणीही त्याबाबतीतला करू नये. ज्या पद्धतीनं ही योजना राबवली जात आहे, महिलांना लाभ मिळत आहे, त्यामुळे अधिकाधिक प्रभावी पद्धतीने ही लाडकी बहीण योजना पुढे सुद्धा राबवली जाणार आहे.***

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने येत्या १४ आणि १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ११व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची संपूर्ण तयारी झाली असून त्याची कार्यक्रम पत्रिका निश्चित करण्यात आली असल्याची माहिती स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी आज बीड इथे पत्रकार संवाद बैठकीत दिली. साहित्य संमेलन दशकपूर्तीनंतर होणारं पहिलं संमेलन असल्याचं रापतवार यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या येल्डा इथल्या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी तयार केलेल्या हंगामी वसतिगृहातल्या ४० पैकी ३७ विद्यार्थ्यांना भोजनातून विषबाधा झाल्याची घटना काल सायंकाळी घडली. या विद्यार्थ्यांना उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वाराती रूग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांना निगराणीखाली ठेवण्यात आलं आहे. या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

****

मुंबई विद्यापीठात भारतीय भाषा संवर्धन आणि प्रसार केंद्राची स्थापना करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या विविध विभागातील मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराती, कन्नड, सिंधी, पाली, प्राकृत, उर्दू आणि पारशी धर्मियांची अवेस्ता अशा भाषांसह घटनेत अनुसूचित असलेल्या २२ भाषांचा यात समावेश असेल. नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेत या अनुषंगाने ठराव करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या भारतीय भाषा संवर्धन समितीच्या अनुषंगाने उच्च

शिक्षणात भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी या केंद्राचं महत्व अधोरेखित होणार आहे.

****

सैनिकांच्या बलिदानामुळेच आपण सुरक्षित आहोत, असं सांगून माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव कटिबध्द असल्याचं हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी म्हटलं आहे. हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात आज सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनास प्रारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, आदींची उपस्थिती होती.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमिताने काल पासून महापालिकेच्या वतीनं विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. आज महापालिकेच्या मुख्यालयात रक्तदान शिबिर घेण्यात आलं. ३६ अधिकारी- कर्मचाऱ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवत रक्तदान केलं. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या रक्त पेढीच्या वतीनं रक्त संकलन करण्यात आलं.

****

जालना शहर महानगर पालिकेनं आज शहरातल्या बसस्थानक परिसरात मुख्य रस्त्यावर आलेली २० अतिक्रमणं हटवली. शहरात गेल्या दोन दिवसांपासून हाती घेण्यात आलेली ही अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचं मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितलं.

****

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची हिवाळी सत्र परीक्षा येत्या ७ जानेवारीपासून सुरु होणार आहे. त्या अनुषंगाने पदवी तसंच पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या नियमित विद्यार्थ्यांनी येत्या १५ डिसेंबर पर्यंत ऑनलाईन पद्धतीने गृहपाठ सादर करावेत, असं आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केलं आहे.

****

मुंबईसह राज्यात पुन्हा थंडी सुरु झाली आहे. गेल्या ९ वर्षातल्या सर्वात कमी तापमानाची मुंबईत नोंद झाली असून मुंबईत किमान तापमान २० अंशांपर्यंत घसरलं आहे. नाशिकमध्येदेखील तापमानात घट झाली असून आज सकाळी नाशिकमध्ये ९ पूर्णांक ४ अंश सेल्सीअस तर निफाड मध्ये ६ पूर्णांक २ अंश सेल्सीअस

तापमानाची नोंद झाली. दरम्यान उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे मुंबईसह नाशिक, आणि पुण्यात येत्या २४ तासांत थंडीचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलं आहे.

****